# पाचवी परीक्षा प्रश्नपत्रिका २०१४

उमेदवाराचे नाव ________________________________ वय__________
पत्ता ____________________________________________________
परीक्षा केंद्र ______________________________________________
परीक्षा संचालकाचे नाव _______________________________________
परीक्षा संचालकाची सही ________________________ तारीख ___________

लेखी परीक्षा गुणदान

| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | लेखी गुण | एकूण गुण (निम्मे गुण) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्राप्त गुण | | | | | | | | | | |
| पैकी गुण | १० | १० | १० | १० | १० | १० | १० | १० | ८० | ४० |

तोंडी परीक्षा गुणदान

| | प्रार्थना श्लोक | इतर विषयी माहिती | सामान्य ज्ञान माहिती | कविता गाणी | श्रवण प्रश्नोत्तरे | वाचन प्रश्नोत्तरे | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| प्राप्त गुण | | | | | | | |
| पैकी गुण | ५ | ५ | १० | १० | १५ | १५ | ६० |

एकूण गुण

/ १००

प्रश्न क्र.१. खालील तक्त्यातील माहिती वाचून शब्द गणिते सोडवा. उत्तर कसे काढले ते दाखवा आणि पूर्ण वाक्यात उत्तर लिहा.**उत्तरातील संख्या शब्दांत लिहा.**

१० गुण

| आफ्रिका खंडातील प्राण्यांची मोजणी | | | | |
|---|---|---|---|---|
| प्राणी | सिंह | हत्ती | जिराफ | झेब्रा |
| संख्या | ३५,६३० | ६०,००० | ३६,९२७ | ४०,१७८ |

१) आफ्रिका खंडात हत्तींची संख्या सिंहांच्या संख्येपेक्षा किती जास्त आहे ?

---

२) दुष्काळ पडल्यामुळे जिराफांची संख्या दहा हजाराने कमी झाली तर किती जिराफ उरतील?

---

३) प्राण्यांची चांगली काळजी घेतल्याने हत्तींची संख्या दुप्पट झाली तर आता हत्तींची संख्या किती असेल?

---

४) तक्त्यात दिलेली प्राण्यांची संख्या वाढत्या क्रमाने लिहा.

________________________________

________________________________

________________________________

________________________________

५) अभयारण्याच्या एका भागात कोणत्या प्राण्यांना एकत्र ठेवता येईल आणि का? कारण लिहा.

---

---

---

---

प्रश्न क्र.२. खालील उतारा आणि तक्त्यातील माहिती वाचून वर्तमान पत्रासाठी ५-७ वाक्यात बातमी लिहा. १० गुण

आज यश खूप उत्साहात होता कारण त्याच्या शाळेत, 'शाळा प्रमुख' पदासाठी निवडणुक होणार होती. फक्त दहावीच्या वर्गातल्या मुलांना, या निवडणुकीत उभे राहता येणार होते. त्याच्या वर्गातील इतर तीन मुलांनीही आपली नावे दिली होती. शाळेतील सर्व मुले मतदान करणार होती!

निवडणुक कोण जिंकले?

| अभिनव विद्यालय, पुणे **-शाळा प्रमुख निवडणुक निकाल-** २ जानेवारी २०१४ | | | | |
|---|---|---|---|---|
| उमेदवार | यश | अनुजा | मिहीर | आरती |
| मते | ३०० | १०२ | १०५ | १५० |

बातमी:

-------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------

प्रश्न क्र.३ खालील कोणत्याही **<u>एका</u>** विषयावर १० वाक्यांचा निबंध लिहा.

१० गुण

मी केलेला प्रवास / प्रदूषण कसे कमी कराल / भारतीय कला

______________________________________________________________

______________________________________________________________

______________________________________________________________

______________________________________________________________

प्रश्न क्र .४ अ) वाक्प्रचार व त्यांच्या अर्थाच्या वाक्यांच्या जोड्या लावा. ५ गुण

| वाक्प्रचार | योग्य वाक्य लिहा | वाक्य |
|---|---|---|
| पोटात कावळे ओरडणे | ------------------------------------------ | खूप कष्ट घेणे |
| चेहरा खुलणे | ------------------------------------------ | अडचण निर्माण होणे |
| जीवाचे रान करणे | ------------------------------------------ | आनंद होणे |
| कुरकुर करणे | ------------------------------------------ | तक्रार करणे |
| पंचाईत होणे | ------------------------------------------ | खूप भूक लागणे |

प्रश्न क्र .४ ब) खालील कोणत्याही <u>एका</u> विषयावर ५-६ वाक्याचे पत्र लिहा.५ गुण

१) आजी आजोबांना दिवाळीच्या खाऊचे पार्सल मिळाल्याचे कळवा.
२) तुमच्या मित्राला /मैत्रिणीला वाढदिवसानिमित्त स्लीप-ओव्हरचे आमंत्रण करा.

प्रश्न क्र.५ अधोरेखित शब्दांच्या जागी त्या शब्दाच्या विरुद्धार्थी शब्द वापरा आणि आवश्यक ते बदल करून अर्थपूर्ण वाक्य तयार करा व लिहा. १० गुण

उदाहरण:

यशला जास्त मते मिळाली व तो शाळा प्रमुख निवडणूक जिंकला.

यशला **कमी** मते मिळाली व तो शाळा प्रमुख निवडणूक **हरला**.

१) पाणी खूप गरम झाले की त्याची वाफ होते.

२) आईला रस्त्यात खूप ट्रॅफिक लागला म्हणून ती उशिरा आली.

___________________________________________

३) अव्यवस्थितपणामुळे घर घाणेरडे दिसत होते.

___________________________________________

४) कचरा टाकल्यामुळे आई नाराज झाली.

___________________________________________

५) सूर्य मावळल्यावर सगळीकडे अंधार पसरला.

___________________________________________

प्रश्न क्र.६ खालील वाक्ये वाचून बरोबर  किंवा चूक  अशी खूण करा.
१० गुण

१)रवींद्रनाथ टागोर यांना नोबेल पारितोषिक मिळाले.________

२) शिवाजी महाराज संत तुकारामांच्या कार्याने दु:खी झाले . _______

३) पसायदान, संत ज्ञानेश्वरांची रचना आहे.________

४) क्रिकेट हा खेळ भारतात विशेष खेळला जात नाही.__________

५) कौरव-पांडव यांच्या युद्धाला रामायण म्हणतात. _________

६) लोकसभा व राज्यसभा भारतीय संसदेचे दोन भाग आहेत._______

७) भारताच्या प्रत्येक राज्यात विविध कला आणि भाषा आढळतात._______

८) भारताला  ९६ वर्षांपूर्वी स्वातंत्र्य मिळाले. _______

९) महाराष्ट्र राज्याची निर्मिती १ मे, १९३० या दिवशी झाली.______

१०)गंगा नदीचा उगम विंध्य पर्वतांमधून  होतो .______

प्रश्न क्र.७ योग्य उत्तराभोवती गोल करा. १० गुण

१)भारतात अनेक ठिकाणी दगडातून तयार केलेल्या मूर्ती दिसतात. ही  कला येणाऱ्यांना _______________ म्हणतात. ( **चित्रकार / शिल्पकार / पत्रकार** )

२) भारतात जनतेचे राज्य म्हणजेच _________________ आहे. ( **राजेशाही / लोकशाही / हुकुमशाही** )

३) अपघात  ह्या शब्दाला,  ____________________  हा समानार्थी शब्द आहे. ( **मंगल / दुर्घटना / अचानक** )

४) निरोगी शरीर व योग्य वाढीसाठी समतोल आहारातून ________________ मिळणे आवश्यक असते. ( **पक्वान्ने / जीवनसत्त्वे / कोका कोला** )

५) सगळयात जास्त वेळ कोणत्या घटनेला लागेल? ______________________
( **टिचकी वाजवायला / एक गाणे म्हणायला / एक स्वेटर विणायला** )

६) मानवाची प्राचीन काळापासूनची गोष्ट म्हणजेच जगाचा _______________.
(**भूगोल / इतिहास / सर्वनाश** )

७) मराठी ‘तिथी’ दिनदर्शिका, _________________पृथ्वीभोवती  फिरण्यावर अवलंबून असते. ( **सूर्य / चंद्र / नक्षत्र** )

८) मोकळ्या वेळेचा चांगला उपयोग करण्यासाठी _______________ असणे महत्त्वाचे असते. ( **आळशी** / **छंद** / **चक्रम** )

९) प्रदूषणामुळे होणाऱ्या ग्लोबल वॉर्मिंगने पृथ्वीचे तपमान _____________ आहे. ( **तेवढेच** / **कमी** / **वाढत** )

१०) पृथ्वीवर होणाऱ्या भूकंप, ज्वालामुखी , दुष्काळ व महापूर यांना _______________ असे म्हणतात. ( **आशीर्वाद** / **श्रेष्ठत्व** / **नैसर्गिक संकटे**)

प्रश्न क्र.८ अ)खालील उताऱ्याचे इंग्रजीतून मराठीत भाषांतर करा. ५ गुण

Last evening,I came home late from my swimming class. I found out that my friends Arun and Misha had already gone to the theatre. We had planned to see,”The Harry Potter “ movie and had purchased three tickets in advance. So my father dropped me off at the front entrance. Then we bought pop-corn and went straight inside.

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

प्रश्न क्र.८ ब)खालील उताऱ्याचे मराठीतून इंग्रजीत भाषांतर करा. ५ गुण

माझा जन्म वाई या गावात झाला. आमचे घर म्हणजे मोठा वाडा होता. मी अकरावीपर्यंत गावातल्या हायस्कूलमध्ये शिकलो. माझा नातू निकोलस, याला माझ्या लहानपणाबद्दल फार कुतूहल होते. याविषयी तो नेहमी खूप प्रश्न विचारीत असे. तो १८ वर्षांचा झाला तेंव्हा आजोबा, आजी व नातू असे आम्ही तिघेजण वाईला गेलो. आमचा वाडा पाहून निकोलसचे डोळे आनंदाने चमकले. माझ्या मनात पण लहानपणीच्या आठवणी जाग्या झाल्या.